RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ११, अंक ४९] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर ४-१०, २०२५/अग्रहायण १३-१९, शके १९४७ [पृष्ठे, ७ किंमत : रुपये १५.००

**प्राधिकृत प्रकाशन**

**संकीर्ण सूचना व जाहिराती**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**

दिवाणजी कॉम्प्लेक्स, अंबाजोगाई रोड, लातूर

**चौकशीची जाहीर नोटीस**

क्रमांक धउआ/४०८५/२०२५

**चौकशी अर्ज क्रमांक- १३३/२०२५ कलम ७९ अअ**

**सार्वजनिक न्यासाचे नाव - लोक जागृती शिक्षण प्रसारक मंडळ, रापका, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर नोंदणी क्रमांक एफ/९७/ लातूर.**

**अर्जदार - श्रीमती निलीमा अरूणराव राणे**

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उप आयुक्त, लातूर विभाग, लातूर यांचे कार्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ७९ अअ प्रमाणे श्रीमती निलीमा अरूणराव राणे यांनी न्यासाचे परिशिष्ट एक पुनर्लिखित करण्याकरिता अर्ज सादर केलेला आहे.

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उप आयुक्त, लातूर विभाग, लातूर हे वर नमूद केलेल्या न्यासाचे संबंधी व वर नमूद केलेल्या अभिलेख्यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ७९अअ अन्वये परिशिष्ट एक पुनर्लिखीत करणेकामी चौकशी करीत आहेत. तरी सदर जाहिरात प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत या कार्यालयात अर्जदाराने सादर केलेल्या रेकॉर्डचे निरीक्षण करून व त्या कागदपत्रांना हरकत असल्यास त्यांनी त्यांचेकडे असलेल्या योग्य त्या कागदपत्रासह लेखी आक्षेप नोंदवावा. सदर तारखेनंतर प्राप्त झालेल्या हरकती / आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त, लातूर विभाग, लातूर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ११/११/२०२५ रोजी दिली.

**अ. ह. सरोदे,**
अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
लातूर विभाग,लातूर.

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय

सोलापूर विभाग, सोलापूर

**जाहीर नोटीस**

**सोलापूर येथील मे. धर्मादाय उप आयुक्त सोलापूर यांच्या न्यायालयात**

**१) सौ. शकुंतला लक्ष्मण गायकवाड**
अध्यक्ष तुळजाभवानी महिला मंडळ शेळगांव आर
ता. बार्शी, जि. सोलापूर,
नोंदणी क्रमांक एफ-५६७८ / सोलापूर
**व इतर ०१**

योजना अर्ज कमांक १२३६/२०२४
कलम ५० अ ( २ )
अर्जदार

विरूध्द

**१) श्रीराम ग्राम विकास मंडळ शेळगांव (आर) बार्शी**
नोंदणी क्र. एफ-५७८४ / सोलापूर चे सदस्य
श्री. लक्ष्मण रामहरी गायकवाड.
**इतर ०१**

सामनेवाला

सदरकामी वरील सामनेवाला न्यास श्रीराम ग्राम विकास मंडळ शेळगांव ( आर ) बार्शी. नोंदणी क्रमांक :- एफ - ५७८४ / सोलापूर ही महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५० अ ( २ ) अन्वये जंगम व स्थावर मालमत्ता व शैक्षणिक युनिटसह अर्जदार न्यास तुळजाभवानी महिला मंडळ शेळगांव आर ता. बार्शी, जि. सोलापूर, नोंदणी क्रमांक एफ- ५६७८ / सोलापूर या न्यासात विलिनीकरण करणेबाबतचा अर्ज क्रमांक १२३६ / २०२४ सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर या कार्यालयात दाखल करण्यात आला आहे.

त्याअर्थी, या नोटीशीव्दारे जाहीर करण्यात येते की वरील सार्वजनिक न्यासाशी हितसंबंध असणाऱ्या या लोकांना सदर विलिनीकरणाबाबत काही निवेदन / हरकत दाखल करावयाचे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत लेखी निवेदन / हरकत किंवा म्हणणे वरील चौकशी क्रमांक १२३६/२०२४ निर्दिष्ट करून या कार्यालयात आपण स्वतः किंवा वकिलामार्फत दाखल करावी. ३० दिवसानंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही आणि सदर विलिनीकरण अर्ज एकतर्फा हुकम करून सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त सोलापूर यांच्या शिक्यानिशी आज दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी दिली.

(**टीप.—** सदरील नोटीस प्रसिध्द करण्याचा खर्च न्यासाच्या अर्जदार यांच्यावरती राहील .)

अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सोलापूर विभाग, सोलापूर.

## बुलढाणा जिल्हा परिषद, बुलढाणा

### अधिसूचना

क्र. बुजिप/साप्रवि/नियोजन/प्र.क्र./३८१४/२०२५

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १४२ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती ( वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिध्द करणे ) नियम, १९६४ च्या कलम ९ अन्वये, मी, गुलाब खरात ( भा.प्र.से. ), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा या ज्ञापनाव्दारे जिल्हा परिषद, बुलढाणा चा सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिध्द करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**गुलाब खरात** ( भा.प्र.से. ),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा.

**जिल्हा परिषद, पालघर**

**अधिसूचना**

क्रमांक पाजिप/साप्रवि/नियो-१/१३८४

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या अधिनियम, १९६१ चे कलम १४२ अन्वये महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिध्द करणे संबंधित चे नियम, १९६४ व सुधारित नियम, १९६६ व १९८१ च्या अनुषंगाने व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्र. संगणक - १०९५ / सीआर / २९५४ / ५७ दि. २४ जानेवारी १९९५ द्वारे दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पालघर जिल्हा परिषदेचा सन २०२४-२५ चा वार्षिक प्रशासन अहवाल तयार करण्यात आला आहे.

**महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग चार ब असाधारण क्रमांक १५३ ग्रामविकास व जलसंधारण जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेनी दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजी मान्यता दिली आहे. सदर वार्षिक प्रशासन नियम ९ अन्वये प्रसिध्द करणेत येत आहे.

**मनोज रानडे** (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पालघर.

जिल्हा परिषद, पालघर,
दिनांक २१ नोव्हेंबर २०२५.

**Serial No. M-2521**

**Multi Commodity Exchange of India Ltd.**

*Registered office :* Exchange Square, Suren Road, Chakala, Andheri (East), Mumbai 400 093, India.

CIN: L51909MH2002PLC135594

The proposed amendments to the Memorandum of Association of Multi Commodity Exchange of India Limited (MCX) were published in the Gazette of India on October 18, 2025, and in the Maharashtra Gazette on October 23, 2025, for inviting objection/suggestion/criticism, if any, from persons likely to be affected. Pursuant thereto, the Securities and Exchange Board of India (SEBI) has *vide* its letter No. HO/47/25/11(1) 2025 MRD-RAC1/I/131/2025 dated November 21, 2025 accorded its approval to the amendments to the MOA of MCX as stipulated therein. The MOA amended hereunder shall stand effective from the date of its publication in the Gazette of India or Gazette of State of Maharashtra, whichever is later, as under :

**Proposed amendments to Memorandum of Association:**

The Clause V of Memorandum of Association of MCX shall be amended by substituting with the following revised clause:

"The Authorised Share Capital of the Company is Rs. 700,000,000 (Rupees Seventy Crores) divided into 350,000,000 (Thirty-Five Crores) equity shares of Rs. 2/- (Rupees two) each with the power to increase and / or reduce the capital, to divide the shares in the capital for the time being into several classes and to attach thereto such preferential, deferred, qualified or special rights, privileges or conditions in such manner as may be determined by or in accordance with the regulations of the Company and to vary, modify or abrogate any such rights, privileges or conditions in such manner as may be permitted by the Act or by the regulations of the Company and consolidate or sub-divide the shares and issue shares of higher or lower denominations."

*For* Multi Commodity Exchange of India Ltd.

MANISHA THAKUR,
Company Secretary.

Place : Mumbai,
Date : 28th November 2025.

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

### अधिसूचना

क्रमांक झोपुप्रा/बृ/अभि/३क(१)/पिरूभाई एस.आर. ए. सह.गृह. संस्था (नियो)/मालाड (पू.)पी-उ/२०२५/४६६८०.—ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ब च्या पोट-कलम (३) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करून दिनांक ९ एप्रिल १९९८ रोजी **राजपत्रात** प्रसिद्ध केली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (क) उप-कलम (१) अनुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपुप्रा, बृहन्मुंबई) यांना आहेत.

त्याअर्थी, उक्त कलम ३ (क) चे उप-कलम (१) मधील अधिकाराचा वापर करून मी, खालीलप्रमाणे अनुसूचीमध्ये दर्शविलेले क्षेत्र "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून याद्वारे घोषित करीत आहे. सदरचे क्षेत्र बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ चे नियमन ३३ (१०) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करण्यास पात्र आहे.

### अनुसूची

मौजे मालाड (पू.), तालुका बोरीवली

स्थळ - पिरूभाई कंपाऊंड, संजीवनी हॉस्पिटल जवळ, केदारमाल रोड, मालाड (पू.), मुंबई. प्रभाग - पी-उ

अर्जदार - पिरूभाई एस. आर. ए. सह. गृह. संस्था (नियो)

| अ. क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र (चौ. मी.) | एकत्रित चतुःसीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | ४५४ | १३९.३० | १३९.३० | रस्ता न.भू.क्र. ४५५पै | न. भू. क्र. ४५३, ४५७ | न. भू. क्र. ४५६/अ, ४५६/ब, ४५७ | रस्ता न. भू. क्र. ४५२, ४५५/२६ |
| २ | ४५४/१ ते १२ | २६२.४० | २६२.४० | | | | |
| ३ | ४५५ | ७४४.३० | ६४७.६६ | | | | |
| ४ | ४५५/१ ते २१ | ३७१.९० | ३७१.९० | | | | |
| **एकूण** | | **१५१७.९०** | **१४२१.२६** | | | | |

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई,**
प्रशासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१,
दिनांक १७ नोव्हेंबर २०२५.

**डॉ. महेंद्र कल्याणकर,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
बृहन्मुंबई.

## SLUM REHABILITATION AUTHORITY, BRIHANMUMBAI

*NOTIFICATION*

No. SRA,B/ED/OW/3C(1)/Pirubhai SRA CHS (prop) /Malad (E)/PN/2025/46680.—Whereas, the Slum Rehabilitation Authority has formed Slum Rehabilitation Scheme under the provision of section 3B (*3*) of Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 and published in *Gazette* on 9th April 1998 ;

Whereas, in view of the provision of section 3C (*1*) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971, the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority, SRA (Brihanmumbai) is empowered to declare any area as "Slum Rehabilitation Area".

Therefore, in view of the said provision of section 3C (*1*) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971. I, undersigned is hereby declare the area shown in schedule as "Slum Rehabilitation Area". Now the said area is open to submit scheme of slum rehabilitation as per regulation 33(*10*) of Development Control and Promotion Regulation, 2034 of Brihanmumbai.

*Schedule*

Village Malad (E), Taluka Borivali

Place – Pirubhai Compound Near Sanjivani Hospital, Kedarmal Road, Malad (E.), Mumbai Ward – P/N

Applicant –Pirubhai SRA CHS (prop)

| Sr. No. | C.T.S. No. | Area as per Property card (Sq.mtr.) | Area declared as "Slum Rehabilitation Area" (Sq. mtr.) | Consolidated Boundaries | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | East | West | South | North |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1 | 454 | 139.30 | 139.30 | C.T.S. No. 455 (pt) | C.T.S. No. 453, 457 | C.T.S. No. 456/A, 456/B, 457 | C.T.S. No. 452, 455/26 |
| 2 | 454/1 to12 | 262.40 | 262.40 | | | | |
| 3 | 455 | 744.30 | 647.66 | | | | |
| 4 | 455/1 to 21 | 371.90 | 371.90 | | | | |
| **Total** | | **1517.90** | **1421.26** | | | | |

**Slum Rehabilitation Authority,**
Brihanmumbai,
Administrative Building,
Prof. Anant Kanekar Marg,
Bandra (E.), Mumbai 400 051,
Date 17th November 2025.

DR. MAHENDRA KALYANKAR,
Chief Executive Officer,
Slum Rehabilitation Authority,
Brihanmumbai.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.